डॉ. सी. डी. देशमुखांच्या राजीनाम्यामुळे मुंबई महाराष्ट्रात
(नवीन संशोधन)

डॉ. सी. डी. देशमुखांनी केंद्रीय वित्तमंत्रीपदाचा राजीनामा २३ जानेवारी १९५६ रोजी दिल्यानं द्विभाषिक राज्य झाले परंतु मराठी भाषिक राज्यनिर्मिती झाली नव्हती. आपल्या मित्राने मंत्रीपदाचा त्याग करुनही पूर्ण यश मिळाले नाही हे पाहून राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी गोपनिय खेळीने देशमुखांचे इप्सित १ मे १९६० रोजी पूर्ण केले.

भाषावार प्रांत रचनेसाठी नेमलेल्या न्या.फाजल अली आयोगाने; केंद्रशासीत मुंबई, महाराष्ट्र आणि गुजरात अशी ३ राज्ये निर्माण करण्याची शिफारस केली. लोकसभा चिकित्सासमिती समोर हा प्रश्न गेला. निर्णय येण्याअगोदरच मुंबई केंद्रशासीत होणार असे पंतप्रधान पं.नेहरुंनी १६ जानेवारी १९५६ रोजी आकाशवाणीवर जाहीर केले. कुलाबा या लोकसभा मतदार संघाची व मुंबईची भौगोलिक संलग्नता होती. मुंबई अलग झाली असती तर मराठी भाषिकांचे नुकसान होणार असल्यामुळे मुंबई केंद्रशासीत करण्यास त्यांचा विरोध होता. या होणाऱ्या नुकसानीत आपला सहभाग नसावा या हेतूने त्यांनी अर्थमंत्रीपदाचा राजीनामा २३ जानेवारी १९५६ रोजी पंतप्रधानांकडे पाठवून दिला.

आयोग निर्णयाचा निषेध करण्यासाठी मुंबईतील हजारो गिरणी कामगार रस्त्यावर उतरले. संघर्ष चिघळून २ आठवडयात हुतात्म्यांची संख्या १०५ पर्यंत पोहोचली.

येणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निधी लागणार असल्यामुळे भांडवलदारी विचारांच्या खासदारांचा पंतप्रधानांवर दबाव वाढल्यामुळे सी.डी. देशमुखांचा राजीनामा मंजूर केला नाही. ६ महिन्यानी म्हणजे २२ जुलै १९५६ रोजी राष्ट्रपती भवनातून सीडींचा राजीनामा स्वीकारल्याचे जाहीर झाले. २५ जुलै रोजी संसदेमधील निवेदनात **'मी राजीनामा दिला याचे कारण असे की, राज्य पुर्नरचना विधेयकाप्रमाणे महाराष्ट्रापासून मुंबई शहर विभक्त करण्याच्या निर्णयात मी सहभागी होऊ इच्छित नाही.'** या परखड निवेदनाने 'चिंतामणी, देशाचा कंठमणी' अशा शब्दांत आचार्य अत्रे यांनी त्यांच्या मराठा या दैनिकात अग्रलेख लिहून गौरव केला.

द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती

निस्वार्थी वित्तमंत्र्यांच्या राजीनामा प्रसंगी केलेल्या निवेदनाचे पडसाद संसद सदस्यावर पडले. मुंबई केंद्रशासित करण्याचे विधेयक संसदेत संमत करणे अशक्य वाटल्याने तडजोडीचा पर्याय म्हणून मुंबई, महाराष्ट्र व गुजरात मिळून एक विशाल द्विभाषिक राज्याची निर्मिती करण्याचा आराखडा तयार झाला. मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे करु नये ही सी.डींची भूमिका स्वीकारण्यात येऊन विधेयकास संसदेची मंजुरी मिळून द्विभाषिक राज्य जाहीर झाले.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र न झाल्यामुळे जनतेचे समाधान झाले नाही. ते कसे करावयाचे हा प्रश्न पडला असल्यामुळे १९५७ च्या निवडणूकीत मुंबई व कोकणात काँग्रेसचे पानिपत झाले.

मित्राची गोपनिय खेळी

मोरारजी देसाई, स.का.पाटील वगैरे नेते मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीस विरोध करत होते. ते दोघेही पक्ष निधी गोळा करण्यास मदत करत असल्यामुळे पंडित नेहरु हतबल झाले होते. कोणत्याही स्वार्थाशिवाय सीडींनी राजीनामा दिला होता तरीही सीडींचे इप्सित पुरे झाले नव्हते. ते करण्यासाठी गोपनिय खेळी करुन या मित्रानी मदत करण्याचे ठरविले.

द्विभाषिक मुंबई राज्य तयार झाले परंतु ते एकभाषिक धोरणानुसार नाही ही सीडींची भूमिका त्यांच्या डॉ. राजेंद्र प्रसाद व राज्यपाल श्रीप्रकाश या दोघा मित्रांना माहिती होती. भूमिका पूर्णत्वास नेण्यासाठी प्रत्यक्ष हस्तक्षेप करता येणं शक्य नव्हते. ते दोघेही राजकारणीच असल्यामुळे त्यांनी गोपनिय खेळी केली.

मुंबईत असंतोष असल्याची काही हालचाल दिसल्यास तसा अहवाल पाठविण्यात राज्यपालाना सांगितला. तशी संधी १९५९ च्या उत्तरार्धात आली. हवेत गोळीबार झाला होता. **'मुंबई महाराष्ट्रास दिली नाही तर येथे अराजक माजण्याची शक्यता आहे' असा अहवाल राज्यपालानी राष्ट्रपतींकडे पाठविला.** ही राजकीय गोळी नेमकी लागली. पंतप्रधान नेहरुंना काँग्रेस श्रेष्ठींना समजविण्यासाठी कारण मिळाले. पंतप्रधानांनी काँग्रेस संसदीय मंडळासमोर ठेवला. त्यांनी निर्णय घेऊन मुंबई महाराष्ट्राला द्यायचे ठरविले. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्यनिर्मिती झाली. गोपनिय अहवाल मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांना समजण्याचा मार्ग नव्हता.

नागपुर विधानसभेतील यशवंतराव चव्हाण यांचे भाषण

नागपूर येथे महाराष्ट्र सरकारचे हिवाळी अधिवेशन १२ ऑगस्ट १९६० रोजी झाले तेव्हा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी पुढील उद्‌गार काढले.

'मुंबईसह महाराष्ट्र राज्य अनपेक्षितपणे लवकर निर्मित झाले आणि मी थोडासा अदृश्य शक्तीवर विश्वास ठेवणारा आहे.'

विधीमंडळातील यशवंतरावांची निवडक भाषणे


जी गोष्ट लवकर घडेल असे वाटले नव्हते ती अनपेक्षितपणे लवकर घडून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले आहे. तसेच याही बाबतीत आमचे प्रयत्न कधीतरी सफल होतील असा मला विश्वास आहे. मी थोडासा अदृश्य शक्तीवर विश्वास ठेवणारा आहे. महाराष्ट्राचे स्वप्न साकार होण्याच्या मागे जनतेच्या मेहनतीचा भाग आहे आणि आमच्या राष्ट्रीय नेत्यांचे आशीर्वादही आहेत. परंतु जनतेच्या प्रयत्नामागे कोठली तरी अदृश्य शक्ती आहे

(याचा संदर्भ मा.शरद पवार यांनी यशवंतराव जन्मशताब्दी निमित्त लिहिलेल्या लेखात दिला आहे.)

१ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्मिती झाल्यावर राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसादांनी सीडींना सांगितले आपल्या आईच्या हातचे मोदक खाण्याची इच्छा आहे. डॉ.राजेंद्र प्रसाद व सीडी समवयस्क आणि एकाच समाजाचे असल्यामुळे त्यांनी दिल्लीत असताना सीडींच्या आईत स्वतःच्या आईचे प्रेम बघितले होते. आशिर्वादाची व मोदक खाण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी ११ डिसेंबर १९६० रोजी रोह्याला आले. तेथे रेस्ट हाऊस आणि फोन नव्हता तरी रोहेकरानी जंगी स्वागत केले. राजेंद्र प्रसाद घरी आले आणि आईला साष्टांग नमस्कार घालून आशिर्वाद घेतले. मधुमेह असूनही खोबऱ्याच्या चवाचे मोदक खाल्ले आणि सीडींचे गुणगान केले. सीडींनी या गोपनिय खेळीचे पितृत्त्व कधीही आपल्याकडे घेतले नाही म्हणून वर्तमानपत्रात जाहिर झाले नाही.

(फोटोमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद, राज्यपाल श्री. श्रीप्रकाश व नगराध्यक्ष ॲड.वाय.डी.देशमुख व्यासपीठावर बसलेले असून सौ. दुर्गाबाई देशमुख दुसऱ्या रांगेत आहेत. सी.डी. सभेच्या नियोजनावर देखरेख करीत होते.)

मित्रांच्या या गोपनिय खेळीची बातमी सी.डी.नी होऊ दिली नाही, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे हे वेगळे दर्शन आहे. आपण मात्र सीडींनी संयुक्त महाराष्ट्रासाठी राजीनामा दिला म्हणून त्यांना संकुचित करीत आहोत. विशाल दृष्टीच्या सीडी व दुर्गाबाईंना हे सतत टोचत असे परंतु दोघानीही स्पष्टीकरणासाठी वर्तमानपत्राकडे धाव घेतली नाही. वयाच्या ७५ वर्षी तळे येथे नळ पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्यासाठी आले असताना गप्पांच्या ओघात मन मोकळे केले. यशवंतराव चव्हाण यांच्या वाक्यांतील अदृश्य शक्तीचा मागोवा लागला नव्हता परंतु शोध घेतल्यावर त्याचा संदर्भ रोह्यात व तळे येथे वडिलोपार्जित गावात मिळाला.

डॉ. सीडी आणि दुर्गाबाई देशमुख, विरोधी पक्षनेते धुळप आणि तळे येथिल गावकरी

सीडींसारख्या थोर व्यक्तीमुळे मुंबई महाराष्ट्राला मिळाली परंतु त्यांना आपल्या सरकारने महाराष्ट्र भुषण किंवा राष्ट्रपुरुष मानले नाही. तसे झाले असते तर त्यांचे स्मरण करण्यासाठी विधानसभेच्या प्रवेशद्वारी त्यांचा अर्धपुतळा आणि सर्व शासकीय कार्यालयात तैलचित्र ठेवले असते.

डॉ. श्रीनिवास वेदक
९५९५३४३५३२